MHAU100002702022

## नियमीत दिवाणी दावा क्र. ४२/२०२२

योगेश पि. गोविंदराव विटखेडे + १

विरुद्ध

प्रसाद पि. बंडु ऊर्फ बंडुराव ऊर्फ गिरजीनाथ विटखेडे व इतर

## निशाणी क्र.५ खालील आदेश
## (दिनांक २०/०६/२०२२)

प्रस्तुत कामी निशाणी क्र.५ खालील अर्ज वादी यांनी प्रतिवादींविरुद्ध तात्पुरता मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. त्यानंतर वादींनी त्यांना फक्त प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या पासुन भिती असल्याने निशाणी क्र.५ हा फक्त प्रतिवादी क्र.१ व २ विरुद्ध आहे अस समजण्यात यावे अशी पुरसीस निशाणी क्र.३२ वर दाखल केली आहे.

२) अर्जदार म्हणजे वादीच्या मालकीची व ताब्यातील वडीलोपार्जीत मिळकत वार्ड क्र.२, ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक ४२७ ज्याचे क्षेत्रफळ ६३ X २० फुट (१२६० चौ.फुट) व ३० X २० फुट (६०० चौ.फुट) मौजे वेरुळ, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद येथे असुन त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | :- | सरकारी रस्ता, |
| पश्चिमेस | :- | सरकारी रस्ता, |
| दक्षिणेस | :- | श्री. सोनाजी शंकर बाबरेकर, |
| उत्तरेस | :- | नागोराव महादेव विटेकर यांचे राहते घर |

वरील वर्णनाची जमीन ही दाव्याचा विषय आहे. त्यास ''दावामिळकत'' किंवा ''दावाजमीन किंवा वादमिळकत'' असे संबोधले आहे.

३) प्रस्तुत दाव्यातील नमुद वादी हे नात्याने सख्खे भाऊ–बहीण असुन वादी यांचे आजोबा स्व. बाबुराव गणपतराव विटखेडे हे होते व त्यांचे सन १९८५ मध्ये निधन झालेले आहे. त्यांना दोन पत्नी नामे शकुंतलाबाई बाबुराव व कुसुमबाई बाबुराव या होत्या. शकुंतलाबाई बाबुराव यांचे निधन झालेले असुन त्यांना एकमेव मुलगा वादी यांचे वडील गोविंदराव बाबुराव हे होते. त्यांचे सन २०१९ मध्ये निधन झालेले असुन आई अनुसयाबाई गोविंदराव यांचे सन २०13 मध्ये निधन झालेले आहे, तर वादी यांचे आजोबा गोविंदराव यांच्या दुसऱ्या पत्नी कुसुमबाई यांचे देखील निधन झालेले असुन त्यांना दोन मुले चंद्रकांत व बंडु ऊर्फ बंडुराव ऊर्फ गिरजीनाथ व दोन मुली प्रभावती व मालती असे अपत्य होते. त्यापैंकी बंडु ऊर्फ बंडुराव ऊर्फ गिरजीनाथ यांचे निधन झालेले असुन त्यांना पत्नी शैला व तीन मुली नामे शितल, सारीका, सरीता व एक मुलगा नामे प्रसाद असे अपत्य होते. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ८ हे त्यांचे नातेवाईक/नातेसंबंध आहेत.

४) सदर मिळकत सिटी सर्वे क्रमांक २५९ ज्याचा ग्रा.पं. मिळकत क्रमांक ४२७ असा असुन सदर संपुर्ण मिळकत ही मुळ मालक बाबुराव गणपतराव विटखेडे यांनी त्यांचे हयातीत पहिली पत्नी शकुंतलाबाई पासुन झालेला मुलगा वादी यांचे वडील स्व. गोविंद बाबुराव विटखेडे यांना कामयस्वरुपी दिलेली असुन त्यानुसार ग्रा.पं. अभिलेखात गोविंद बाबुराव विटखेडे यांच्या नावे स्वतंत्र फेरफार व नोंदी असुन त्या विना आव्हानीत निरंतर कायम आहे, तरी दुसरी पत्नी कुसुमबाई व तिच्या पासुन झालेले मुले चंद्रकांत व बंडु ऊर्फ बंडुराव ऊर्फ गिरजीनाथ व मुली प्रभावती व मालती म्हणजेच नमुद प्रतिवादी क्र.१ ते ८ यांना इतरत्र मिळकती व शेतजमीनी या हिश्यात वाटुन दिलेल्या असुन त्यांचा दावा मिळकतीशी काहीएक हक्क व संबंध नाही. वादी यांचे वडील स्व. गोविंद बाबुराव विटखेडे हे दावा मिळकतीचे एकमेव कायदेशीर मालक व प्रत्यक्ष कब्जेदार होते. त्यांनी त्यांचे हयातीत दावा मिळकतीचे कायदेशीर मालक व

प्रत्यक्ष कब्जेदार या नात्याने निरंतर उपभोग घेत आलेले असुन दावा मिळकतीचे कर, पाणी पट्टी इत्यादी त्यांनी स्वतः एकटयानेच दरसाल अदा केलेले आहे. तसेच त्यांचे निधनानंतर वादी हे त्यांचे कायदेशीर व एकमेव वारस या नात्याने दावामिळकतीचे कायदेशीर मालक व प्रत्यक्ष कब्जेदार म्हणुन उपभोग घेत आलेले आहेत. एवढेच नाहीतर दावा मिळकतीचा ग्रां.प. कराचा नियमित भरणा देखील वादी यांनी स्वतः केलेला आहे.

५) प्रतिवादी यांचा दावामिळकतीचे मालकी व कब्ज्याशी काहीएक कायदेशीर संबंध नाही. परंतु जानेवारी २०२२ मध्ये नमुद प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी वादी यांना दावा मिळकतीत बेकायदेशीर अडथळा निर्माण करुन अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला, एवढेच नाहीतर दावामिळकतीच्या लागु रस्त्यावर व लगतच्या जागेवर बेकायदेशीररित्या कॉलम खोदुन, अतिक्रमण करुन बेकायदेशीर अवैध बांधकाम सुरु केले, त्यावेळी वादी यांनी प्रतिवादी क्र.९ ग्रा.पं. यांना वेळोवेळी समक्ष लेखी व तोंडी तक्रार दिली. परंतु प्रतिवादी क्र.९ ग्रा.पं. यांनी नमुद प्रतिवादी यांच्या अवैध अतिक्रमण बेकायदेशीर बांधकाम उलट आश्रय देवुन वादी यांनाच तुमचा अर्धा प्लॉट प्रतिवादी यांचा आहे, त्यांना बांधकाम करु द्या ! नसता तुमच्यावर कार्यवाही करु! अशा धमक्या देवुन वादी यांना प्रतिवादींविरुद्ध कार्यवाही करण्यास नकार दिला. त्यामुळे जानेवारी २०२२ मध्ये वादी यांनी प्रतिवादी ग्रा.पं. यांच्याकडे दावा मिळकतीच्या नमुना नं.८ च्या प्रतीची मागणी केली असता प्रतिवादी ग्रा.पं. यांनी ती देण्यास टाळाटाळ करुन अगोदर दावामिळकतीचे घर पट्टी थकबाकी भरणा करा त्यानंतरच तुम्हाला नमुना क्र.८ ची नक्कल देऊ असे सांगितले. त्यामुळे दिनांक ३१/०१/२०२२ रोजी प्रतिवादी ग्रा.पं. यांनी वादी यांचेकडुन रक्कम रुपये ५०००/- सन २०२१-२०२२ च्या कराची थकबाकी घेतली.

६) वादीने नमुना नं.८ उताऱ्याची नक्कल दिनांक ०९/०२/२०२२ रोजी

हस्तगत केली असता वादी यांचे असे लक्षात आले की, दावा जमीनीचा मालकी रकान्यात वादी यांचे वडील स्व. गोविंद बाबुराव विटखेडे यांच्या नावे कंस देवुन ते कमी करण्यात येवुन शैला बंडु विटखेडे, चंद्रकांत बाबुराव विटखेडे, गोविंद बाबुराव विटखेडे असे नाव परस्पर नमुद केल्याचे दिसुन आले. तर शेरा रकान्यात फेरफार रजिस्टर पान क्र.७/२०२१ नुसार फेर करण्यात आले सामाईक क्षेत्र १२६० चौ. फुट व ६०० चौ.फुट अशी नोंद ही वादी यांच्या माघारी परस्पर बेकायदेशीर, गैरमार्गाचा अवलंब करुन केल्याचे वादी यांच्या निदर्शास आले, त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी ग्रा.पं. यांच्याकडे सदर बेकायदेशीर फेरफार व संचिका व दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रतीची मागणी केली असता प्रतिवादी ग्रा.पं. यांनी आज, उद्या असे म्हणुन वेळ निभावुन घेतली व दिनांक ०९/०३/२०२२ रोजी दावा मिळकतीचे फेरफार रजिस्टरची प्रमाणित प्रत प्रतिवादी ग्रां.प. यांनी वादी यांना दिली असता सदर प्रतिचे अवलोकन केल्यानंतर वादी यांच्या असे लक्षात आले की, नमुद प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी प्रतिवादी क्र.८ ग्रा.पं. वेरुळ यांचेशी संगणमत करुन दावामिळकत हडप करण्याचे उद्देशाने प्रेरित होवुन दावा मिळकतीचे मुळ मालक व कब्जेदार वादी यांचे वडील स्व. गोविंद विटखेडे व तद्नंतर त्यांचे कायदेशीर वारस म्हणुन वादी हे असतांना आपसी संगणमत व कटकारस्थानातुन वादी यांचे माघारी परस्पर ग्रा.पं. वेरुळ मिळकतीचे फेरफार रजिस्टरला फेरफार क्र.१८ वर दिनांक २३/०९/२०२१ रोजी वादी यांचे वडील स्व. गोविंद बाबुराव विटखेडे यांचे नाव कमी करुन नवीन मालकाचे नाव रकान्यात १) शैला बंडु विटखेडे, २) चंद्रकांत बाबुराव विटखेडे, ३) गोविंद बाबुराव विटखेडे यांचे नावाचे टिपन रकान्यात अर्जदाराने दिनांक ०५/०४/२०२१ रोजी अर्ज केले १०/– रु. बॉण्ड पेपरवर ग्रा.पं. सभा दिनांक २८/०६/२०२१ ठराव क्र.८/७ या अधारे फेर घेण्यात आली. अशा खोटया बनावट दस्ता अधारे घेतलेला फेरफार नोंद ही खोटी, बनावट, बेकायदेशीररित्या वादी यांचे माघारी परस्पर गैरमार्गाचा अवलंब करुन

घेण्यात आली असुन सदर फेर मंजुर करतेवेळी वादी यंना कोणत्याही प्रकारची सुचना, माहिती व नोटीस दिलेली नाही.

७) वादीने अर्जात पुढे असे कथन केले की, दिनांक २०/०३/२०२० रोजी वादी यांनी गावातील प्रतिष्ठतांच्या व उभयतांच्या नातेवाईकांचे माध्यमातुन बैठक बसवुन वादी यांनी प्रतिवादी यांना दावा मिळकतीच्या अनुषंगाने परस्पर नोंदविलेले दस्त रद्द बातल करण्याची व दावा मिळकतीत अतिक्रमण करण्याचा अगर बांधकाम करण्याचा प्रयत्न करु नये तसेच दावामिळकतीत अडथळा, हस्तक्षेप न करता दावामिळकती पुर्ववत वादीचे वडीलांच्या नावे करण्याची व तद्नंतर वारसाने वादीचे नावे करण्यास अडथळा करु नये करीता विंनती केली असता नमुद प्रतिवादी यांनी त्यास इन्कार करुन दावा मिळकती कोठेही विक्री, गहाण, दान, तारण करुन टाकु अशी धमकी दिल्याने दिनांक ३०/०३/२०२२ रोजी प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचे कारण घडले. प्रतिवादी हे कधीही वादी यांना वादमिळकतमधुन बेदखल करेल व प्रतिवादी हा वादमिळकतीचा ताबा घेण्याच्या स्वरुपात आहे. त्यामुळे प्रतिवादीने दाव्याचा निकाल लागेपर्यंत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यसाठी वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

८) प्रतिवादी क्र.१ व २ यांनी तात्पुरता मनाई अर्जास जबाब निशाणी क्र.२९ वर दाखल केला. त्यांनी त्यांच्या जबाबात सांगितले की, सदरचा अर्ज हा प्रतिपालीनीय नाही व वादीने मा. न्यायालयासमोर सत्यता लपवुन तसेच चुकीच्या माहीती अधारे मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केलेला असुन तो खर्चासहीत फेटाळण्यात यावा असे कथन केले आहे. प्रतिवादी यांना अर्जातील संपुर्ण मजकुर अमान्य असुन त्यांनी फक्त नातेसंबंधामधील मजकुर व मृत्यूबाबत तसेच वंशावळ ही बाब मान्य केली आहे. सदर वादमिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत

असल्याचे मान्य करुन तिच्या कायदेशीररित्या वाटण्या झालेल्या नसल्याचे सांगितले. सदर वादमिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वाडीलोपार्जीत मिळकत असुन वादीचे आजोबा बाबुराव विटखेडे यांना त्यांच्या वडीलांपासुन व त्यांना त्यांच्या वडीलांपासुन सदरची जागा आलेली आहे. कागदपत्रानुसार प्रतिवादीचे अजोबा बाबुराव गणपतराव विटखेडे हे सिटी सर्वेचे कायदेशीर मालक व ताबेदार होते. त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांची मुले व नातु, पंतु हे हिंदु वारसा कायद्यानुसार वारस आहे व प्रत्येक प्रतिवादीचा हिंदु कायद्यानुसार प्रत्येक जागेवर हिस्सा आहे. वादमिळकत ही कधीही वादी यांच्या वडीलांना देण्यात आलेली नाही. कारण प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ ही वेळोवेळी सदर मिळकतीचे कर भरत होते व गोविंद विटखेडे हे मोठे बंधु होते व एकत्र कुटूंबकर्ता असल्यामुळे त्यांचे नाव ग्रामपंचयात येथे कर भरण्यापुरते लावण्यात आलेले होते. त्यावेळेस मयत बंडु हे अज्ञान व सर्वात लहान भाऊ असल्याने त्यांचे नाव लावलेले नव्हते. सदर मिळकतीबाबत एक वर्षी गोविंदराव कर भरायचे व दुसऱ्या वर्षी बंडुराव हे कर भरायचे. बंडुराव यांच्या मृत्यूपश्चात प्रतिवादी क्र.१ ही कर भरत असे. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीने सदरची जमीन हडपण्यासाठी वादीने दावा दाखल केला आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर करावा असे म्हणणे प्रतिवादीने त्यांच्या जबाबात दिले. वादीला सकृतदर्शनी केस मुळीच नाही तसेच न्यायाचे समतोलत्व देखील वादीच्या बाजुने नाही. तसेच सकृतदर्शनी केस व बॅलन्स ऑफ कन्वहीनियन्स हे प्रतिवादीच्या बाजुने असल्याने वादीचा दावा व अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

९) दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझ्या निर्णयाकरिता उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी त्या खालील दिलेल्या कारणमिमांसेस अनुसरुन देत आहे.

**CNR No. MHAU100002702022**
**Exh.5**

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | सकृतदर्शनी केस ही वादीच्या हक्कात आहे असे वादीने सिध्द केले काय ? | ........**नाही .** |
| २) | न्यायाचे समतोलत्व हे वादीच्या बाजुने आहे हे वादीने सिध्द केले आहे काय ? | ........**नाही.** |
| ३) | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होईल हे वादीने सिध्द केले आहे काय? | ........**नाही.** |
| ४) | कोणता आदेश? | **अर्ज नामंजुर करण्यात येतो........** |

**का र ण मि मां सा**

**मुद्दे क्र.मांक १ ते ३ करिताः–**

१०) वादीतर्फे वकील श्री. एस.सी. झाल्टे व श्री. शेख उस्मान ताहेर व प्रतिवादीं तर्फे वकील श्री. ए.व्ही. काझी यांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांचे वकीलांनी युक्तीवादात सांगितले की, दावाजमीन ही वडीलोपार्जीत आहे परंतु कौटूंबीक वाटाघाटीप्रमाणे वादी यांच्या नावे दावा जमीन कायमस्वरुपी देण्यात आली होती. वादींच्या वडीलांचे नावे जमीन असतांना प्रतिवादींनी खोटे कागदपत्रे देवुन वादींच्या वडीलांचे नाव कंसात टाकुन दावा जमनीवर स्वतःचे नाव लावुन घेतले. दावा जमनीचे कर हे वादीचे वडील भरत आलेले आहेत त्या संदर्भात कर पावती अभिलेखावर दाखल केलेली आहे. दावामिळक ही वादी यांच्या वडीलांच्या नावे होती व आहे. त्यावर वादी यांचा ताबा आहे. सकृतदर्शनी केस ही वादीचे बाजुने आहे तसेच न्यायाचे समतोलत्व देखील वादीच्या बाजुन असल्यामुळे वादी यांचा तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर करण्यात यावा. तसेच वादी यांच्या हक्कात मनाई हुकुम दिला नाही तर त्यांचे अपरिमीत नुकसान होईल असा युक्तीवाद वादीचे वकीलांनी केला.

११) प्रतिवादींचे वकीलांनी युक्तीवाद केला की, दावा जमीन ही वडीलोपार्जीत असुन त्या जमीनीची अद्याप वाटणी झालेली नाही. वादींनी दाखल केलल्या दस्तांवर फक्त वादींचे नाव नसुन त्यावर प्रतिवादींचे नाव देखील आहे. त्यावरुन दावाजमीन ही फक्त वादीच्या ताब्यात आहे असे म्हणता येणार नाही. जमीनीचे वाटणी हिस्से झाले नसल्याने कोणाचा कोणता हिस्सा आणि किती हे ठरवता येत नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीने दावा हा चुकीचा आणला आहे. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, वादीने वाटीणीचा दावा आणायला पाहिजे होता परंतु त्यांनी तसा आणलेला नाही. एका बाजुला त्यांना नातेसंबंध कबुल आहेत तर दुसऱ्या बाजुला प्रतिवादींचा दावामिळकतीशी काहीएक संबंध नाही असे कथन करतात. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज हा खोटा आणि तर्क विरहीत आहे. त्यामुळे वादींचा अर्ज खार्चासहीत फेटळाण्यात यावा असा युक्तीवाद प्रतिवादींच्या वकीलांनी केला.

१२) वादीचा अर्ज, प्रतिवादीचा जबाब तसेच दाखल दस्त पाहिले. वादींनी अभिलेखावर दावामिळक्तीचा नमुना क्र.८, कर पावती तसेच दावा जमीनीचे फेरफार पत्रक आणि ग्रामसेवक यांना दिलेल्या पत्राची छायांकित प्रत दाखल केली आहे. अभिलेखावरील दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरचा दावा हा जाहीर करुन मिळण्यासाठी तसेच कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेबाबत केला आहे. एका बाजुला वादी त्यांच्या अर्जात म्हणतात की, त्यांच्या जमीनीवर प्रतिवादींनी अतिक्रमण केले आहे आणि दुसऱ्या बाजुला वादी असे म्हणतात की दावा जमीनीवर त्यांचा ताबा आहे. तात्पुरता मनाई हुकुम मिळवण्यासाठी सर्व प्रथम वादी प्रथमदर्शनी जमीनीचे मालक व ताबेदार आहेत हे दाखवणे आवश्यक आहे. अभिलेखावरील दाखल दस्तांवरुन कुठेही दावा जमिनीवर फक्त वादीचा ताबा आहे हे दिसुन येते नाही. वादीने दावा मिळकतीचा नमुना क्र.८, कर आकारणी नोंदवही दाखल केले त्यावर वादी यांच्या वडीलांसहीत प्रतिवादी यांचे देखील नावे आहेत. वादीने कर भरल्याची भावती दाखल केली

त्यावर वादीचे वडीलांचे नाव दिसुन येते. पंरतु कर भरल्याची पावतीवरुन वादीचा ताबा आहे हे सिध्द होत नाही. वादींनी त्यांच्या अर्जात कथन केले की, दावा जमीनीचे मुळ मालक बाबुराव विटखेडे हे होते व त्यांनी वादींच्या वडीलांच्या नावे म्हणजे गोविंद यांच्या नावे दावा जमीन कायमस्वरुपी दिलेली आहे. परंतु त्या संदर्भात कोणतेही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. फक्त वादीच्या तोंडी कथनांवरुन दावा जमीन फक्त त्यांच्या ताब्यात आहे हे गृहीत धरता येणार नाही. वादीने स्वतः कथन केले आहे की, दावा जमीन ही वडीलोपार्जीत जमीन आहे आणि प्रतिवादींना देखील हे कबुल आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वाटणी झालेली आहे आणि दावा जमीन ही वादींच्या वडीलांच्या नावे कायमस्वरुपी दिलेली आहे. या उलट प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वाटणी झालेली नाही. दाखल दस्तावरुन दावा जमीनीचा ताबा हे वादी व प्रतिवादींचा आहे असे दिसुन येते. अशा परिस्थीतीत एकाच्या हक्कात मनाई हुकुम देता येणार नाही.

१३) आजरोजी प्रथमदर्शनी दस्तावरुन ताबा कोणाचा आहे हे पाहणे आवश्यक आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे दावा जमीनीचे मालक व ताबेदार ते आहेत. वादी हा दावामिळकतीचा मालक आहे हे दाखविण्यासाठी त्याने कोणतेही कागदपत्रे दाखल केले नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी वादीने मागितलेला तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज हा वादीच्या हक्कात आहे हे दिसुन येत नाही. आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूमाचा अनुतोष (Relief) हे Discretionary Relief आहे. त्याकरिता वादीला प्रथमदर्शनी केस, न्यायाचे समतोलत्व हे सिध्द करणे आवश्यक आहे. या सर्व बाबी वादीला स्वतः सिध्द करणे आवश्यक आहे. सर्व दस्तऐवजांचे अवलोक केले असता असे दिसून येते की, सकुतदर्शनी केस ही वादीच्या हक्कात मुळीच नाही व न्यायाचे समतोलत्व देखील वादीच्या बाजुने नाही. त्यामुळे तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज वादीचे हक्कात दिला नाही तर त्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून मी

मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.४ करिताः–**

१४) वरील चर्चेअंती मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी असल्याकारणाने मी मुद्दा क्र.४ करिता खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**–:: आदेश ::–**

१) वादीचा निशाणी क्र.५ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२) प्रस्तूत अर्जाचा खर्च अंतिम निकालाप्रमाणे राहील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHRAVANTI VIJAYRAO RAJKUNTWAR
Date: 2022.06.21 14:43:32 +0530

खुलताबाद (एस.व्ही. राजकुंटवार)
दिनांकः– २०/०६/२०२२ दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
खुलताबाद, जि. औरंगाबाद

**CNR No. MHAU100002702022**
**Exh.5**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file Judgment / order are same word for word, as per original Judgment / order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | ***Akash S. Chavan*** |
| Name of the Court | :- | C.J.J.D. and J.M.F.C. Court, Khultabad. |
| Dated | :- | 20/06/2022 |
| Order signed by the Presiding officer on | :- | 20/06/2022 |
| Order uploaded on | :- | 21/06/2022 |